**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४**

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 485
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- ३०.०६.२०२१

***निकाल प्राधान्य/तातडीचे***

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य मंडळाकडे/वितरण केंद्रावर जमा करण्याबाबत...**

**संदर्भ :-**
**१. शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२, दिनांक २८.०५.२०२१**
**२. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य परीक्षा/३३७ दि. ०१.०६.२०२१.**
**३. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/३७१ दि. १०.०६.२०२१.**
**४. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/३७८ दि. १४.०६.२०२१.**
**५. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/४४५ दि. २४.०६.२०२१.**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्र क्र. ४ व ५ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा २०२०-२१ साठी माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य मंडळाकडे दि. **०१.०७.२०२१ ते ०२.०७.२०२१** या कालावधीत वितरण केंद्रावर जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि काही शाळांकडून निकाल साहित्यासोबत जमा करावयाच्या कागदपत्रांबाबत वारंवार फोन येत असल्याने याबाबत खालीलप्रमाणे कागदपत्रे पाकीटामध्ये भरण्याबाबत कळविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **परिशिष्टे** |
|---|---|---|
| १ | नियमित विद्यार्थी (विषयनिहाय) | १.०१ ते १.१० |
| २ | पुनर्परिक्षार्थी (विद्यार्थीनिहाय) | २.०१ ते २.०२ |
| ३ | खाजगी विद्यार्थी (विषयनिहाय) | ३.०१ ते ३.०९ |
| ४ | तुरळक विषय घेवून प्रविष्ट झालेले विद्यार्थी (विद्यार्थीनिहाय) | ४.०१ |
| ५ | संकलित निकाल तक्ते (नियमित विद्यार्थी) | आर ०१ ते आर ०५ |
| ६ | संकलित निकाल तक्ते (खाजगी विद्यार्थी) | पी-०१ ते पी-०४ |

निकाल समितीने निकालाचे परीक्षण व नियमन करून निकाल अंतीम केल्यानंतर उपरोक्त परिशिष्टातील माहिती भरून स्वाक्षरीत व प्रमाणित केलेली मुळ परिशिष्टे (विषयनिहाय निकाल, संकलित निकाल, विद्यार्थीनिहाय तपशिल इ.) इयत्ता ९ वी च्या निकालपत्रकाची प्रमाणित छायाप्रत तसेच इ. ५ वी ते ९ वी (लागू असल्याप्रमाणे) गुणपत्रक/निकालपत्रकाची प्रमाणित छायाप्रत ही कागदपत्रे पाकीटात घालून निकाल समिती अध्यक्ष (मुख्याध्यापक) तसेच समिती सचिव यांच्या स्वाक्षरीने सिलबंद करून, शाळेचा सांकेतांक व शाळेचे नांव लिहून, सिलबंद स्वरूपात संबंधित वितरण केंद्रावर जमा करावीत.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank